# जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय,अकोला.

दुरध्वनी क्र. 0724-2424442
email address -rdc_akola@redimail.com

फॅक्स 0724-2435007
web address :www.akolanic.in

**क्र.कक्ष-2/प्रस/गृह/कावि- 332/2020** **दिनांक: 20/ 05 /2020**

**वाचा: सार्वजनिक आरोग्य विभाग,शासन निर्णय क्रमांक: करोना-2020/प्र.क्र.58/ आरोग्य-5, दिनांक 14/05/2020**

## आदेश

महाराष्ट्र राज्यात कोरोनाबाधित रुग्णांचे प्रमाण वाढत असल्याने आजारास प्रतिबंध व नियंत्रण यासाठी तातडीच्या व आपत्कालीन उपाययोजना सुरु करण्यात आलेल्या आहेत. यात रुग्ण शोध मोहीम,रुग्णांचे विलगीकरण व एकंदरच विषाणू आजार प्रतिबंध व नियंत्रण या बाबी करण्यात येत आहेत. तसेच साथरोग अधिनियम 1897 मधील तरतूदी लागू करण्यात आलेल्या आहेत. या परिस्थितीत राज्यातील करोना बाधित रुग्णसंख्या आटोक्यात ठेवणे, पादुर्भाव रोखणे व प्रतिबंधात्मक उपायजोना करणे याचा दैनंदिन आढावा घेण्यात येत आहे तथापि, वाढती रुग्णसंख्या व भविष्यात उद्भवणारी उद्रेकजन्य परिस्थीती लक्षात घेता, खाजगी वैद्यकीय व्यावसायिक व खाजगी रुग्णालये यांचेकडूनही रुग्णसेवा घेणे अपरिहार्य ठरले असून याबाबत शासन स्तरावरुन आदेश निर्गमीत झालेले आहेत.

केंद्र शासनाकडून व राज्य शासनाकडून कोविड-19 उपचारासंदर्भात पारीत झालेले विविध आदेश, मार्गदर्शक सूचना, अधिसूचना, इ. बाबींवर मुख्य सचिव स्तरावर चर्चा होऊन खाजगी वैद्यकीय व्यासायिकांना पीपीई किट उपलब्धतेबाबत येणाऱ्या अडचणी तसेच कोविड-19 उपचारानंतर सामाजिक स्तरावरुन येणाऱ्या अडचणी नुसार खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांना कोविड-19 उपचारासाठी येणाऱ्या अडचणी निराकरणे करणे व कोविड-19 च्या उपचारासंदर्भात केंद्र व राज्य शासनाकडून पारीत झालेल्या आदेशाची अंमलबजावणी व सामाजिक सुरक्षा या अनुषंगाने समन्वय समन्वय राखण्यास्तव **उपरोक्त आरोग्य विभागाच्या शासन निर्णयात दिलेल्या निर्देशानुसार अकोला जिल्ह्यात करोना विषाणू (COVID-19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासन व खाजगी वैद्यकीय व्यावसायिक यांचे समन्वयास्तव खालील प्रमाणे जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात येत आहे**.

| अ.क्र. | समिती सदस्यांचे पदनाम | समितीतील पद. |
|---|---|---|
| 1 | जिल्हाधिकारी | **अध्यक्ष** |
| 2 | मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद | सदस्य |
| 3 | जिल्हा पोलीस अधिक्षक, | सदस्य |
| 4 | आयुक्त,महानगरपालिका | सदस्य |
| 5 | जिल्हा शल्यचिकित्सक | **सदस्य सचिव** |
| 6 | जिल्हा अध्यक्ष,इंडीयन मेडीकल असोसिएशन (महाराष्ट्र राज्य) यांचे प्रतिनिधी. | आमंत्रीत |

**उपरोक्त समितीची उद्दीष्टे व कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहतील.**

- ❖ जिल्ह्यातील करोना विषाणू संसर्ग प्रतिबंधात्मक व नियंत्रणात्मक उपाययोजनांच्याबाबत निर्गमीत झालेले विविध शासन निर्णय तसेच औषधोपचाराबाबतचे प्रोटोकॉल सर्व संबंधितांना उपलब्ध करुन देणे.
- ❖ खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांना व त्यांचे रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना वैयक्तिक सुरक्षा उपकरणे (पीपीई किटस्,ग्लोव्हज,मास्क) उपलब्ध करुन देणअयाबाबत आवश्यक ते शासकीय सहकार्य करणे.
- ❖ कोविड-19 उपचार देणाऱ्या खाडगी वैद्यकिय व्यावसायिक व आरोग्य कर्मचारी यांना सामाजिक सुरक्षा व सौहार्दपूर्ण वागणूक मिळण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करणे.
- ❖ जागतिक आरोग्य संघटना, आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून प्रसारित करण्यात येणाऱ्या विविध उपाययोजनांची जिल्हास्तरीय अंमलबजावणी बाबत शासकीय व खाजगी वैद्यकिय व्यावसायिकंमध्ये समन्वय साधणे.

**सदस्य सचिव तथा जिल्हा शल्यचिकित्सीक,अकोला यांनी उपरोक्त विषयाबाबत शासनाने दिलेल्या निर्देशानुसार आवश्यक ती सर्व कार्यवाही पारपाडून जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष यांना वेळोवेळी अनुपालन सादर करावे. तसेच नियमीत आढावा सभेचे आयोजन करुन सभा इतीवृत्त जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष यांच्या मान्यतेस्तव ठेवून मंजूरी प्रदान करुन घ्यावी.**

**(जितेंद्र पापळकर,भाप्रसे)**
**जिल्हादंडाधिकारी, अकोला.**

..2..

प्रतिलिपी:

1. **मा.प्रधान सचिव,सार्वजनिक आरोग्य विभाग,म.शा.मुंबई**
2. **मा.विभागीय आयुक्त,अमरावती**

**यांना माहितीस्तव सविनय सादर.**

3. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद
4. जिल्हा पोलीस अधिक्षक,
5. आयुक्त,महानगरपालिका जिल्हा शल्यचिकित्सक
6. जिल्हा अध्यक्ष,इंजीयन मेडीकल असोसिएशन (महाराष्ट्र राज्य) यांचे प्रतिनिधी.
7. ______________________________

जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय
सत्यमेव जयते

**(जितेंद्र पापळकर,भाप्रसे)**
**जिल्हादंडाधिकारी, अकोला.**

स्वाक्षरीस्वतव
सादर

स्वाक्षरीस्वतव
सादर